**<u>धर्मादाय उप आयुक्त, गट-अ या संवर्गातील अधिकाऱ्यांची नियतकालिक बदली - २०२६</u>**

# महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

**शासन आदेश क्र.:-सीएचए-२०२६/प्र.क्र.०१/कार्या-१ (ई-१६६३७६०)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २६ मे २०२६.

## <u>शासन आदेश</u>

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(३) मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने विधि व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवरील धर्मादाय उप आयुक्त, गट-अ या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोरील स्तंभ (४) मध्ये दर्शविलेल्या पदावर नियतकालिक बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री. प्रदिप मगनलाल चौधरी | धर्मादाय उप आयुक्त, बीड | धर्मादाय उप आयुक्त, **अकोला** |
| २. | श्रीमती कांचनगंगा संदिप जाधव | धर्मादाय उप आयुक्त, कोल्हापूर | धर्मादाय उप आयुक्त, **बीड** |
| ३. | श्रीमती ममता योगेश राखडे | धर्मादाय उप आयुक्त, नांदेड | सध्याच्या पदावर एक वर्ष मुदतवाढ |
| ४. | श्री. किशोर वसंतराव मसने | धर्मादाय उप आयुक्त, नागपूर | धर्मादाय उप आयुक्त, **अमरावती** |
| ५. | श्री. मोहन दत्तात्रय गाडे | धर्मादाय उप आयुक्त, जळगाव | धर्मादाय उप आयुक्त, **नागपूर** |

२. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी त्वरित कार्यभार घेता यावा म्हणून आवश्यक ती पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिकाऱ्यांना सध्याच्या पदावरुन तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांना बदलीच्या ठिकाणी ताबडतोब रुजू होण्यास निर्देश द्यावे.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत

संबंधित अधिकारी यांनी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा **अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" (dies non) म्हणून गणला जाईल**. तसेच, संबंधितांविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. संबंधित अधिकाऱ्यांना नियमानुसार अनुज्ञेय असणारा पदग्रहण अवधी, प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक भत्ते देय राहतील.

५. संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये व महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३०(सी) नुसार मूळ कार्यालयाने पदस्थापना झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारू नयेत.

६. सदरहू आदेशानुसार संबंधित अधिकारी पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणून बदली रद्द करणे तसेच त्यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती **महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल**, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीच्या पदावर हजर झाल्यानंतर त्याबाबतचा लेखी अहवाल धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर करावा.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२६१३२७००१७१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJIT DEVIDAS BORKAR

Digitally signed by SUJIT DEVIDAS BORKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department, 2.5.4.20=5A2DA98647916B7E9855A22ECA1DDE333B089C86282054EEACBD978B2B81A017, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7704308B7FF87C4C3453297E5225CAF5D9849C4CFFB77ACCF2B2FE315202A47B, cn=SUJIT DEVIDAS BORKAR
Date: 2026.05.26 13:27:47 +05'30'

**(सुजित बोरकर)**
**सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव.
२) मा. राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव.
३) मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व धर्मादाय सह आयुक्त (धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत)
५) संबंधित अधिकारी (धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत)
६) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, संबंधित जिल्हे.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, संबंधित जिल्हे.
८) विधि व न्याय विभाग, कार्यासन १५/१७, मंत्रालय, मुंबई.
९) वैयक्तिक नस्ती/निवड नस्ती (का-१).